# पुणे महानगरपालिका
# शिक्षण विभाग प्राथमिक, शिवाजीनगर, पुणे ०५
## जाहिरात

शिक्षण विभाग प्राथमिक महानगरपालिकेच्या क्रीडानिकेतन शाळांकरिता शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता केवळ ६ महिने करिता करार पद्धतीवर एकवट मानधनावर रक्कम रुपये १०,०००/- दरमहा क्रीडा मार्गदर्शक पदाच्या नेमणूका करावयाच्या आहेत.

पदसंख्या - पदनाम क्रीडामार्गदर्शक - कबड्डी - १, खो-खो -१, हॅण्डबॉल - २, थ्रोबॉल-१, व्हॉलीबॉल-२, योगासन -३, कुस्ती - २, ॲथलेटीक्स - ३, क्रिकेट-१, ज्युदो - १, तलवारबाजी - १ (एकूण १८ क्रीडा मार्गदर्शक)

**अ) क्रीडा मार्गदर्शक यांची शैक्षणिक पात्रता :** कोणत्याही शाखेचा पदवीधर.

**ब) क्रीडा मार्गदर्शक यांची व्यावसायिक पात्रता :** बी.पी.एड. (बॅचलर इन फिजिकल एज्युकेशन) किंवा एम.पी.एड. (मास्टर इन फिजिकल एज्युकेशन) किंवा एन.आय.एस. ६ महिने किंवा १ वर्ष कालावधीचा कोर्स किंवा समकक्ष व्यावसायिक पात्रता (सी.पी.एड.) किंवा किमान राज्य अथवा राष्ट्रीय स्तरावरील झालेल्या स्पर्धेत सहभाग असलेला खेळाडू असावा.

**क) क्रीडा मार्गदर्शक पदाचा अनुभव :** किमान १ वर्ष क्रीडा मार्गदर्शक म्हणून कामाचा अनुभव

वरील क्रीडा प्रकारात आवश्यकतेप्रमाणे बदल करावयाचे अधिकार मा. महापालिका आयुक्तांना राहतील.

१. निवड झालेल्या उमेदवारांना विहीत नमुन्यात करारनामा करावा लागेल.
२. सदरची नेमणूक फक्त ६ महिन्याकरीता देण्यात येईल.
३. वरील पदे ही अस्थायी स्वरूपाची असल्याने या पदावर कायमस्वरुपी हक्क असणार नाही.
४. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
५. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारण करणारा न आढळल्यास गैरवर्तन / दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.
६. जर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध झाले नाही तर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड करण्यात येईल.
७. व्यावसायिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह ७ दिवसांचे आत (सुट्टीचे दिवस वगळून) शिक्षण विभाग प्राथमिक पुणे महानगरपालिका, कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ४११००५ या ठिकाणी कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत समक्ष सादर करावेत.
८. सदर अर्जाचा नमूना पुणे महानगरपालिका https://pmc.gov.in/en/recruitment-0 या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

जाहिरात क्र. १/९३३
दि. २१/११/२०२२

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

RojgarMarathi.com